# महात्मा गांधीजींचा धर्मविचार आणि धर्मनिरपेक्षता

**प्रकाश बाळू नाईक ,** सरूड,ता.शाहूवाडी, जि. कोल्हापूर

---

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजी हे भारत देशाच्या इतिहासावर अमीट ठसा उमटविलेले महान व्यक्तिमत्व आहे. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीला त्यांनी दिलेला एक नवा आयाम हा अत्यंत क्रांतिकारी स्वरूपाचा होता. महात्मा गांधीजींनी राष्ट्रीय काँग्रेसच्या मंचावर या देशातल्या उपेक्षित, वंचित घटकांचे प्रश्न पुढे आणले आणि देशाचा स्वातंत्र्यलढा हा अधिक व्यापक आणि सर्वस्पर्शी केला. त्यामुळेच भारतातल्या जनतेने महात्मा गांधीजींवर प्रचंड प्रेम केले. त्यांच्यावर प्रचंड श्रद्धा ठेवली आणि विश्वासही ठेवला. केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण विश्वामध्ये महात्मा गांधीजी यांच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग आहे. महात्मा गांधीजी हे विसाव्या शतकातील संपूर्ण जगाच्या इतिहासावर नाममुद्रा उमटविणारे महान व्यक्तिमत्व होते.त्यांनी धर्म, अर्थ, शिक्षण, संस्कृती,राजकारण यासह अनेकविध विषयांवरती आपले मौलिक चिंतन व्यक्त केले आहे. आपल्या भाषणाच्या व लेखनाच्या माध्यमातून त्यांनी वेळोवेळी आपले विचार प्रकट केले आहेत.त्यांच्या विचारांतून ते महान तत्वचिंतक असल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात 'महात्मा गांधीजी यांचा धर्मविचार आणि धर्मनिरपेक्षता' या विषयाच्या अनुषंगाने मांडणी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**धर्मनिरपेक्षता** -

भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षता हे तत्व स्वीकारले आहे. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. भारतीय संविधानामध्ये 'धर्मनिरपेक्षता' हा महत्त्वाचा भाग आहे. अर्थात धर्मनिरपेक्षता म्हणजे काय याचा आपण शोध घेतला तर असे दिसून येते की, सार्वजनिक जीवनामध्ये कोणत्याही धर्माचा स्वीकार न करता धर्म ही केवळ खाजगी आणि वैयक्तिक बाब आहे असे मानून कार्य करणे. इतर सर्व धर्मीयांच्या प्रथां-परंपरांचा आणि त्यांच्या विचारांचा आदर करत आपण सर्व धर्मियांना समान न्याय देण्याची भूमिका घेणे यालाच धर्मनिरपेक्षता असे म्हणतात. धर्मनिरपेक्षतेमध्ये कोणत्याही एका धर्माचे लांगूलचालन केले जात नाही.अथवा अथवा कोणत्याही विशिष्ट धर्माला झुकते माप दिले जात नाही. तर सर्व धर्मांना समान न्याय देण्याची भूमिका घेतली जाते.

भारतासारख्या हिंदूबहुल देशांमध्ये इतर अल्पसंख्यांक धर्मीयांच्या हक्कांचे रक्षण करणे हे धर्मनिरपेक्षतेमध्ये अनुस्युत आहे. काही ठिकाणी धर्मनिरपेक्षता याचा अर्थ धर्मच न मानणे असाही घेतला जातो. परंतु हा अर्थ धर्मनिरपेक्षता या तत्त्वाच्या अनुषंगाने तितकासा योग्य वाटत नाही. याचे कारण असे की, भारतीय संविधानाने सुद्धा प्रत्येक नागरिकाला त्याच्या धर्माच्या प्रथांचे पालन करण्याचा अधिकार दिलेला आहे. याचाच अर्थ धर्मनिरपेक्षता म्हणजे निधर्मी अथवा धर्माला नाकारणे असा होत नसून धर्म ही आपली वैयक्तिक बाब आहे आणि सार्वजनिक जीवनामध्ये वावरत असताना मात्र आपण आपल्या धर्माची ओळख बाजूल ठेऊन आपण भारतीय नागरिक म्हणून आपली ओळख ठळक करायची आहे, असे यामध्ये अभिप्रेत आहे. धर्मनिरपेक्षतेच्या अनुषंगा मध्ये जगभरातल्या विविध विद्वानांनी आपली मते अथवा चिंतन मांडलेले आहे. परंतु या साऱ्या मतांचा सारांश घेतला तर आपल्याला असे म्हणता येईल की, सेक्युलरिझम अथवा धर्मनिरपेक्षता हे एक निखळ मूल्य आहे. ते मानवी समाजाला पुढे घेऊन जाणारे आहे आणि मानवी समाजामधील विविध धर्म संस्कृतीच्या अनुषंगाने जे काही ताण-तणाव निर्माण होत आहेत. त्याला बाजूला ठेवून आपण परस्परांचा आदर करत इतरांच्या भावनांना जपत आपण एक उदात्त माणुसकीचा मानवतावादी विचार पुढे घेऊन जाणे हे या धर्मनिरपेक्षता तत्त्वांमध्ये अभिप्रेत असल्याचे आपल्याला दिसून येते .

**महात्मा गांधीजींचा धर्म विचार** -

महात्मा गांधीजी हे स्वतः सनातन हिंदू समजत होते. परंतु त्यांचे हिंदू धर्माबद्दलचे चिंतन आणि आकलन जर आपण समजून घेतले तर हिंदू धर्माच्या संदर्भामध्ये आज काही लोक ज्या पद्धतीने एकांगी आणि कट्टरतावादाकडे

झुकलेली मांडणी करतात तशी मांडणी गांधीजींना अपेक्षित नव्हती, हे लक्षात येते. गांधीजी हिंदू धर्माची व्याख्या करताना म्हणतात की, "अहिंसेच्या मार्गाने सत्याचा शोध घेणे म्हणजे हिंदू धर्म होय."[१] म्हणजेच गांधीजींच्या हिंदू धर्माच्या व्याख्येमध्ये सत्य आणि अहिंसा ही दोन मूल्ये अतिशय ठळकपणे अधोरेखित होतान दिसतात. खरे पाहता गांधीजींनी 'ईश्वर म्हणजेच सत्य आणि प्रेम' अशी मांडणी केली आहे. म्हणजे ईश्वर हा कोणत्या एखाद्या मंदिरात अथवा एखाद्या मूर्तीत आहे असे समजण्याऐवजी सत्य आणि प्रेम ही मूल्ये जगणे म्हणजेच ईश्वराची आराधना करणे अशी गांधीजींची विचारसरणी आपल्याला दिसून येते. गांधीजी असे म्हणतात की, सद्सद्विवेकबुद्धी म्हणजे ईश्वर आणि आपल्या समाजाची व जनतेची सेवा हीच परमेश्वराची सेवा होय. गांधीजींचे हे विचार समजून घेतले तर गांधीजी हिंदू धर्माच्या बाबतीत कसा व्यापक व मानवतावादाच्या चौकटीत विचार करत होते, हे ही ध्यानात येते. गांधीजी स्वतःला सनातन हिंदू समजून घेतात. परंतु वेदप्रामाण्य मानत नाहीत. या त्यांच्या विचारांच्या अनुषंगाने गांधीजींच्या धर्म विचारांच्या संदर्भात जेव्हा आपण चिंतन करतो तेव्हा हे दिसून येते की, गांधीजी हे पारंपरिक धर्म विचारांपेक्षा काहीतरी वेगळा विचार मांडत आहेत. त्यांच्या विचाराचा आणि भारतीय संविधानाने स्वीकारलेल्या धर्मनिरपेक्षता या तत्त्वाचा एक जैविक संबंध आहे. गांधीजींनी म्हटले आहे की, धर्माची कोणी किती पंडित्यपूर्ण व्याख्या केली तरी माझ्या नैतिक बुद्धीला जे पटणार नाही अशा कोणत्याही गोष्टी मी स्वतःला बंधनकारक मानत नाही. म्हणजेच एका बाजूला ते स्वतःला सनातन हिंदू समजतात परंतु ग्रंथप्रामाण्य नाकारतात. चातुर्वर्ण्य मानवतात पण विषमतेला नकार देतात. हे हिंदू परंपरावाद्यांच्या भूमिकेच्या अगदी उलट आहे.महात्मा गांधीची म्हणतात की, माझे हिंदू धर्मावर प्राणापलीकडे प्रेम आहे. आणि दुसऱ्या बाजूला मात्र अस्पृश्यता हा हिंदू धर्माचा भाग नाही असेही ते म्हणतात. "अस्पृश्यता ही धर्माने मान्य केलेली बाब नाही तर ती सैतानाची करामत आहे."[२] या त्यांच्या विधानातून अस्पृश्यता मानणारे अथवा राबविणारे हे सगळे सैतानाच्या परंपरेतील आहेत, हेच गांधीजींना म्हणायचे होते असेही दिसून येते. चातुर्वर्ण्य आणि अस्पृश्यते सारख्या विषमतावादी परंपरेला गांधीजी विरोध करत होते. परंतु एका बाजूला मात्र मी सनातन हिंदू आहे असे म्हणत होते. म्हणजेच हिंदू धर्मातील वाईट प्रथा परंपरांना नेस्तनाबूत करण्यासाठी त्यांना हिंदू धर्माचाच अवकाश वापरायचा होता, असेही दिसून येते. महात्मा गांधीजी 'राम' हे प्रतीक अनुसरतात .परंतु माझ्या चिंतनातला राम वेगळा आहे अशीही ते मांडणी करतात. शुद्राने वेदाभ्यास केला म्हणून मारणारा राम हा माझा राम नव्हे. ही कथा प्रक्षिप्त असावी अशी मांडणी ज्या वेळेला महात्मा गांधीजी करतात. तेव्हा निश्चितपणाने त्यांना मानवतावादाच्या चौकटीतील हिंदू धर्म अपेक्षित असल्याचे दिसून येते. महात्मा गांधीजींनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला. सर्वधर्मसमभावाच्या अनुषंगाने त्यांनी असे म्हटले आहे की, "सर्व धर्माचे मूलतत्त्व एकच आहे. सर्वधर्मसभाव राखला तरच दिव्यचक्षू उघडतील. प्रत्येक धर्मात काही ना काही चांगली तत्त्वं आहेत.मानवता हा प्रत्येक धर्माचा आधार आहे."[३] इतर धर्मियांच्याबद्दलही त्यांनी आदर व्यक्त केला. बुद्ध, पैगंबर आणि येशू ख्रिस्त या धर्मसंस्थापकांबद्दल त्यांनी मांडलेले चिंतन हे निश्चितपणाने महत्त्वपूर्ण आहे.

**निष्कर्ष** -

'धर्मनिरपेक्षता' हे भारतीय संविधानातील महत्त्वाचे तत्व आहे. इतर धर्मियांचा आदर करणे आणि धर्म ही वैयक्तिक बाब मानून आपण सार्वजनिक जीवनामध्ये कार्यरत राहणे, हे या तत्त्वांमध्ये अपेक्षित आहे. महात्मा गांधीजी यांच्या धर्मविषयक चिंतनातसुद्धा हीच विचार दिशा स्पष्ट होताना दिसते. त्यांनी केलेले हिंदू मुस्लिम ऐक्यासाठीचे प्रयत्न, त्यांनी इतर धर्मियांचा केलेला आदर, हिंदू धर्मातीलच काही विषमतावादी परंपरांना त्यांनी धर्माचा अवकाश वापरत केलेला विरोध या सगळ्या गोष्टी महात्मा गांधीजींचा विचार हा एक सर्वसमावेशक आणि सर्वांना भारतीयत्वाच्या अर्थात एकतेच्या सूत्रात गुंफणारा होता हे सिद्ध करणाऱ्या आहेत.

**संदर्भ -**

१. वानखेडे चंद्रकांत, 'गांधी का मरत नाही', मनोविकास प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती २०२०, पृ. ७८

२. तत्रैव पृ. ७५

३. देसाई नारायणभाई, 'अज्ञात गांधी', समकालीन प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, २०१६, पृ. ८९